# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## ❖ मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या नियोजनबद्ध शिक्षण उपक्रमांचा सकारात्मक परिणाम — यंदा दहावीचा निकाल 90.45%

मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाने आपल्या योजनाबद्ध आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून 2024-2025 सालच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. यंदा पालिकेच्या 05 शाळांमधून एकूण 241 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी 218 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाचा टक्का तब्बल 90.45% असून तो मागील वर्षाच्या 65% निकालाच्या तुलनेत उल्लेखनीय वाढ दर्शवतो. या यशामध्ये विशेष उल्लेखनीय कामगिरी शाळा क्रमांक 04 मधील कुमारी प्रीती गायकवाड हिने केली असून तिने सर्वाधिक 85% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच शाळेतील कुमारी निर्मला प्रजापती हिने 83.80% गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये शाळा क्रमांक 03 मधील कुमारी ज्योती शिरसाट आणि शाळा क्रमांक 04 मधील कुमारी भाग्यश्री बंडे यांचा समावेश असून त्यांनी अनुक्रमे 82% गुण मिळवले आहेत.

गेल्या वर्षी महापालिकेच्या दहावीच्या शाळांचा निकाल केवळ 65% होता. हा आकडा चिंतेचा होता. बरेच विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले होते. मात्र, या स्थितीला दोष न देता महापालिकेने स्वतःच्या शैक्षणिक प्रणालीकडे आत्मपरीक्षणाने पाहिले आणि निर्णायक पावले उचलली. शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक अडचणींचा थेट अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. शिक्षक, समुपदेशक, मुख्याध्यापक आणि प्रशासकीय अधिकारी यांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची मोहीम राबवली. या संवादातून जे मुद्दे पुढे आले, ते केवळ अभ्यासाशी संबंधित नव्हते तर आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक आणि भावनिक आव्हानांशी अनुसरून होता. शाळेत उशिरा प्रवेश, आर्थिक अडचणी, अभ्यासात गती पण इतर अडचणी यांसारख्या गंभीर बाबी समोर आल्या. याचे गांभीर्य लक्षात घेऊन मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले.

शिक्षक-विद्यार्थी पालकत्व उपक्रमात प्रत्येक शिक्षकाला 10 विद्यार्थ्यांचे पालकत्व देण्यात आले. हे शिक्षक नियमित संवाद, मार्गदर्शन, गृहपाठ तपासणी, वैयक्तिक अभ्यास नियोजन आणि अभ्यासाच्या अडचणी सोडविणे यासाठी सक्रिय राहिले. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील ही सशक्त भावनिक नाळ विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासासाठी अत्यंत उपयुक्त ठरली. शिक्षक केवळ मार्गदर्शकच नव्हे, तर एक विश्वासू

आधार बनले. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार महत्वाच्या विषय शिक्षकांच्या बरोबरीने स्वतंत्र ट्युशन शिक्षक नियुक्त करण्यात आले. यामुळे महत्वाच्या विषयांवर विशेष लक्ष देऊन त्याचे तास घेण्यात आले.

महापालिकेच्या शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षेपूर्व मार्गदर्शक, अपेक्षित प्रश्नसंच, नोट्स आणि सराव प्रश्नपत्रिका वेळेवर वितरित करण्यात आल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनी व्यवस्थित अभ्यास नियोजन करू शकल्यामुळे आत्मविश्वास वाढला आणि परीक्षेचा तणाव कमी झाला. टेस्ट सिरीज आणि सराव प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्व तयारीसाठी नियमित टेस्ट सिरीज, विषयवार चाचण्या आणि पूर्ण सराव परीक्षा घेण्यात आल्या. या सरावामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेचे स्वरूप समजले, वेळ व्यवस्थापन कौशल्य विकसित झाले आणि आत्मविश्वासात मोठी वाढ झाली. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या यशात लक्षणीय वाढ झाली असून, याचा परिणाम म्हणून यावर्षीचा निकाल उल्लेखनीय झाला आहे. या सकारात्मक अनुभवातून प्रेरणा घेत महापालिकेच्या शिक्षण विभागाने हे सर्व उपक्रम येत्या जून 2025 पासून नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी केवळ विद्यार्थ्यांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी वाढवणे नव्हे, तर त्यांच्या गुणवत्तेतील वाढ साधणे हे मुख्य उद्दिष्ट असेल. ‘100% विद्यार्थी उत्तीर्ण’ हे ध्येय गाठण्यासाठी प्रत्येक विद्यार्थीपर्यंत पोहोचणारी, लक्ष केंद्रित व योजनाबद्ध कार्यपद्धती मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने राबवली जाणार आहे.